मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

# प्राथमिक शाळेसाठी शिक्षक उपक्रम पुस्तिका

ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | उपक्रम | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | इयत्ता पहिली | १ ते ४४ |
| २ | इयत्ता दुसरी | ४५ ते ८६ |
| ३ | इयत्ता तिसरी | ८७ ते १३० |
| ४ | इयत्ता चौथी | १३१ ते १९० |
| ५ | इयत्ता पाचवी | १९१ ते २४२ |
| ६ | सहयोगी खेळ | २४३ ते २५२ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | उपक्रम | पृ.क्र. |
|---|---|---|
| | **विभाग १ : मी आणि माझ्या क्षमता** | |
| १ | कोठे आहे? | ३ |
| २ | तुझे नाव काय? | ४ |
| ३ | तू कोठे राहतोस? | ५ |
| ४ | माझे कुटुंब | ६ |
| ५ | माझी शाळा | ७ |
| ६ | शाळेसंदर्भात अधिक काही | ८ |
| ७ | माझे आवडते प्राणी–पक्षी | ८ |
| ८ | माझे आवडते रंग | ९ |
| ९ | माझा आवडता खेळ | १० |
| १० | खाण्याच्या आवडी नावडी | ११ |
| ११ | माझा आनंद | १२ |
| १२ | मला राग कधी येतो | १२ |
| १३ | राग व्यक्त करताना | १४ |
| १४ | शांत बसणे | १४ |
| | **विभाग २ : माझ्या जबाबदाऱ्या** | |
| १ | शांतता संकेत | १६ |
| २ | वर्गनियम | १७ |
| ३ | खेळाचे नियम | १८ |
| ४ | शाळेचे नियम | २० |
| ५ | सार्वजनिक ठिकाणी नियमांचे पालन | २१ |
| ६ | आरोग्याच्या चांगल्या सवयी | २२ |
| ७ | घरची कामे | २३ |
| ८ | आपण शाळेत काय करतो? | २४ |
| ९ | योग्य–अयोग्य वर्तन | २४ |
| १० | वस्तुंचा योग्य वापर | २६ |
| ११ | खेळतानाची सुरक्षितता | २७ |
| १२ | खोटे का बोलू नये? | २८ |

| अ.क्र. | उपक्रम | पृ.क्र. |
|---|---|---|
| | **विभाग ३ : माझे नातेसंबंध** | |
| १ | प्रत्येकाबद्दल आदर बाळगूया | २९ |
| २ | नम्र की उद्धट | २९ |
| ३ | माझे मित्र–मैत्रिणी | ३० |
| ४ | खरे मित्र | ३१ |
| ५ | चांगला मित्र कोणता? | ३१ |
| ६ | नवे मित्र जोडणे | ३२ |
| ७ | मोठी माणसे आपली काळजी कशी घेतात? | ३२ |
| ८ | आपण इतरांची काळजी कशी घेऊ शकतो | ३३ |
| ९ | त्यांना काय वाटते? | ३४ |
| १० | सागर दुःखी का आहे? | ३४ |
| | **विभाग ४ : मी आणि आपले जग** | |
| १ | आपण वेगळे तरी सारखे | ३६ |
| २ | भारतामधली मुले | ३७ |
| ३ | कुटुंबीयांची कामे | ३८ |
| ४ | उंदराची टोपी | ३९ |
| ५ | सभोवतालची झाडे | ३९ |
| ६ | पाण्याचे उपयोग | ४१ |
| ७ | आपले पाण्याबद्दलचे घोषवाक्य | ४२ |
| ८ | मूल्यांकन | ४३ |

# विभाग १ : मी आणि माझ्या क्षमता

## १. कोठे आहे?

**व्याप्ती** : वर्गातील इतर मुलांची नावे माहीत करून घेणे

**अध्ययन निष्पत्ती** : मुले स्वत:चे नाव स्पष्ट शब्दात आणि मोठ्यांदा सांगतात.

**पूर्वतयारी** : वर्गातील सर्व मुलांच्या नावांची व तितक्याच इतर यादी

**टीप** : मुलांबरोबर चांगली ओळख असेल तर उपक्रमातील १ व २ टप्पा गाळू शकता.

**उपक्रम**

१. मुलांना तुमची ओळख करून द्यावी. त्यांना तुमचे नाव आणि तुमच्याबद्दल काही माहिती द्यावी.

२. सर्व मुलांना त्यांची नावे विचारावी.

३. मुलांना सांगावे :

- मी भराभर नावे वाचणार आहे.
- जर तुम्ही तुमचे नाव ऐकले, तर उभे राहा/ उडी मारा, टाळी वाजवा आणि तुमचे नाव एका वाक्यात सांगा. जसे की, ‘‘माझे नाव मंदार आहे,’’ आणि मग खाली बसा.
- जर मी घेतलेले नाव हे वर्गातील कोणत्याच मुलाचे नसेल तर तर काही बोलू नका. कोणतीही कृती करु नका.

४. नावांचा क्रम बदलून, नावे वाचण्याची गती कमी–जास्त करून सर्व मुलांची नावे मोठ्याने वाचावी.

**पर्यायी उपक्रम**

मुलांना सांगावे :

- तुम्ही प्रत्येकाने आपल्या नावापेक्षा एक वेगळे नाव सांगायचे आहे.
- जर त्या नावाचा मुलगा वर्गात असेल तर त्याने उभे राहून त्याचे नाव एका वाक्यात सांगावे. जसे की, ‘‘मी मनिषा आहे,’’ आणि खाली बसा.
- जर ते नाव वर्गातील कोणत्याच मुलाचे नसेल तर तर काही बोलू नका. कोणतीही कृती करू नका.

**अतिरिक्त उपक्रम**

१. मुलांना सांगावे

- आता आपण एक गाणे म्हणूया.
- प्रत्येक वेळी मी दोन दोन मुलांची नावे घेईन. ज्यांची ती नावे असतील त्या मुलांनी वर्गासमोर येऊन ‘‘मी इथे आहे’’ असे सांगावे.

# विभाग २ : माझ्या जबाबदाऱ्या

## १. शांतता संकेत

**व्याप्ती** : शांतता संकेताचे पालन करणे

**अध्ययन निष्पत्ती** : १. मुले शांतता संकेताचे पालन करतात.
२. मुले शांतता संकेताचा सराव करतात.

**उपक्रम**

१. मुलांना सांगावे : आज आपण एक नवीन गोष्ट शिकणार आहोत. त्यासाठी खालील सूचनांप्रमाणे कृती करा.
- तुम्ही आज सकाळी काय काय केले ते तुमच्या शेजारी बसलेल्या मुलाला सांगा.
- मी माझा हात वर नेलेला पाहिला की सर्वांनी बोलणे थांबवा.
- लगेच तुम्हीपण तुमचा कोणताही एक हात माझ्याप्रमाणे वर करा.
- तुम्ही जे काही करीत असाल, बोलत असाल तर बोलणे थांबवा.
- मी माझा हात खाली केल्यावर तुम्ही तुमचा हात खाली घ्या.
- मी जे सांगेन ते लक्षपूर्वक ऐका.

२. वरील सूचनेप्रमाणे शांतता संकेताचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि मुलांकडून तशी कृती करून घ्यावी.

३. मुलांना सांगावे : या कृतीला 'शांतता संकेत' असे म्हणूया. सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी हा संकेत वापरला जातो.

४. शांतता संकेतामध्ये येणारे खालील टप्पे मुलांना स्पष्ट करून सांगावे.
- बोलणे थांबविणे किंवा करीत असलेले काम थांबविणे.
- एक हात सरळ ताठ वर करणे.
- मी माझा हात खाली घेतल्यानंतरच तुम्ही तुमचा वर केलेला हात खाली घेणे.
- मी दिलेल्या सूचना लक्षपूर्वक ऐकणे.

५. मुलांना सांगावे : आता आपण शांतता संकेताचा सराव करूया.

६. शांतता संकेताचा सराव दोन-तीन वेळा करून घ्यावा. प्रत्येक वेळी खालीलप्रमाणे एखादी सूचना द्यावी.
- तुमच्या दप्तरातून पुस्तक बाहेर काढा.
- मित्राच्या कानात आजचा वार कोणता आहे ते हळू आवाजात सांगा.
- तुमच्या शेजारच्या मुलाला तुमच्या घराचा पत्ता सांगा.

७. मुले एखादे काम किंवा कृती करण्यात दंग असताना शांतता संकेताचा वापर करावा.

८. मुलांना विचारावे :
- मी शांतता संकेत का दिला?

# १०. वस्तूंचा योग्य वापर

**व्याप्ती** : दैनंदिन वापरातील वस्तूंचा योग्य वापर कसा करावा हे ओळखणे

**अध्ययन निष्पत्ती** : मुले रोज वापरायच्या वस्तूंचा वापर योग्य प्रकारे कसा करावा हे दाखवितात.

**आवश्यक बाबी** : ताट, वाटी, कप, बशी, सुरी, पुस्तक, पेन, खेळणे इत्यादी

**उपक्रम**

१. मुलांना वरील वस्तू दाखवाव्या. त्यांची नावे विचारावी.

२. मुलांना सांगावे : मी आता काही वस्तूंचा वापर करणार आहे. मी त्या योग्य पद्धतीने वापरतो आहे का ते सांगा.

३. मुलांना सर्वसाधारणपणे वस्तूंचे केले जाणारे गैरवापर दाखवावे. तसेच त्या वस्तूंचे योग्य वापरही दाखवावे.

४. मुलांना सांगावे : वस्तूंच्या योग्य आणि अयोग्य वापरासंबंधी आपण एक खेळ खेळूया.

५. मुलांना वर्तुळाकार उभे करावे.

६. त्यांना सांगावे :

- बंटी नावाचा एक मुलगा आणि बबली नावाची त्याची एक बहीण आहे. ते काय करतात ते मी तुम्हांला सांगणार आहे.
- जर तुम्हांला असे वाटले की त्यांची कृती बरोबर आहे, तर 'बरोबर' असे सांगून तुमचा उजवा हात वर करा. जर त्यांची कृती अयोग्य असेल तर 'चूक' असे म्हणा आणि दोन्ही हाताची घडी घाला.

७. मुलांना सांगावे :

- बंटी लाईटच्या बटणांशी खेळतो. तो एकसारखी बटणे चालू-बंद करतो.
- बबली हात धुतल्यावर नळ बंद करते.
- बंटी बबलीच्या बाहुलीचे हात पाय ओढतो.
- बबली दूध प्यायल्यावर कप जोरात आपटते.
- बंटी गृहपाठ करताना पेन दाताने चावतो.
- बबली खोलीतून बाहेर पडताना दिवे, पंखे यांची बटणे बंद करते.
- बंटी शाळेतून आल्यावर त्याचा गणवेश काढून जमिनीवर टाकतो.
- बबली कात्रीशी खेळत बसते.
- बंटी पुस्तकाला खाकी रंगाचे कव्हर घालतो.
- बबली फ्रीजचे दार जोरात आपटते.

८. खेळानंतर मुलांना आपापल्या जागेवर बसायला सांगावे. त्यानंतर त्यांना घरातील अन्य वस्तूंच्या योग्य वापराबद्दल प्रश्न विचारावेत, उदाहणार्थ :

- आपण दात घासून झाल्यावर टुथब्रश कुठे ठेवायला हवा?
- आपण हात धुतल्यावर साबण कुठे ठेवायला हवा?

# ११. खेळतानाची सुरक्षितता

**व्याप्ती** : खेळताना कोणती काळजी घेतली पाहिजे हे ओळखणे

**अध्ययन निष्पत्ती** : खेळताना दुखापत होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यायला हवी ते मुले सांगतात.

**आवश्यक बाबी** : विद्यार्थी उपक्रम पुस्तिका

**उपक्रम**

१. मुलांना विचारावे :
- तुम्ही कोणकोणते खेळ खेळता?
- खेळताना कधी कोणाला दुखापत झाली आहे का? केव्हा? कशी?

२. मुलांना सांगावे : आज आपण खेळताना दुखापत होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी लागते याचा विचार करणार आहोत.

३. मुलांना सांगावे :
- उपक्रम पुस्तिकेतील 'तर काय होऊ शकेल?' या शीर्षकाखालील चित्रे पाहा.(पान क्र.१४)
- विचार करा की आपण जर चित्रात दाखविल्याप्रमाणे कृती केली तर काय होईल?

४. प्रत्येक चित्राच्या संदर्भात काही प्रश्न मुलांना विचारावे :
- चित्रातील मुले योग्य कृती करीत आहेत का?
- त्यामुळे काय होऊ शकेल?
- त्यांनी संभाव्य दुखापत टाळण्यासाठी काय करायला हवे?

५. मुलांना एखादे चित्र बारकाईने पाहायला सांगावे. नंतर त्यांना विचारावे :
- या खेळात काय होऊ शकेल?
- आपण हा खेळ खेळत असताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात?
- चित्रातील चौथा खेळ कोठेही खेळावा का?

६. मुलांना विचारावे :
- शाळेच्या मैदानावर खेळत असताना कोणती काळजी घ्यायला हवी?
- शाळा सुटल्यावर शाळेतून बाहेर पडताना कोणती काळजी घ्यायला हवी?

**अतिरिक्त उपक्रम**

उपक्रम पुस्तिकेतील 'खेळू काळजीने' ही कविता म्हणायला सांगावी.(पान क्र.१५)




**उद्‌देश :**

''शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून, संविधानातील मूल्ये व त्यासंबंधित कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना नियोजित अशा संधी सातत्याने देणे.''

**स्वरूप आणि वैशिष्टये :**

- राज्य घटनेतील मूल्ये शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून वयोगटानुसार रुजविण्याचा प्रयत्न
- ज्ञानरचनावादावर आधारित बालस्नेही, आनंददायी, विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्‌धतीचा वापर
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, शिक्षण हक्क कायदा २००९ आणि प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ यावर आधारित
- मूल्ये 'शिकविली' जात नाहीत, तर ती 'नियोजित उपक्रमांतून आनंददायी पद्‌धतीने रुजविली' जातात
- शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधणारा कार्यक्रम
- मूल्यशिक्षणासाठी शाळेमध्ये सध्या होणाऱ्या प्रयत्नांना पूरक कार्यक्रम
- 'समग्र शाळा दृष्टीकोन' (Whole-School Approach) अंगिकारून मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जातो.
- शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम, उपलब्ध असणारी साधन सामग्री यानुसार आवश्यक वाटतील असे बदल करून राबवता येणारा लवचिक कार्यक्रम

---

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)**

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११ ०३०